
# शेवडे गुरुजींच्या गोष्टी



BVBK-0402883

बी॰वी॰
२८८३
१।१।८४

[illegible]
[illegible]
[illegible] २८८३ दिनांक १।१।८४
[illegible]

# भाव तोची देव

लेखक

रा.वा. शेवडेगुरूजी

BVBK-0402883

मधुराज पब्लिकेशन्स प्रा.लि.
२५१ क शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

भाव तोची देव

प्रकाशिका :
सौ. मधुमिता राजीव बर्वे
मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११०३०

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रकाशन क्रमांक ६०२
ISBN 81-85773-20-3

नवीन आवृत्ती :
१ सप्टेंबर १९९३

मुद्रक :
श्री. गिरिश जोशी
श्रीपाद ऑफसेट
शिवकृपा १९४/२ अ नवी पेठ
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ :
श्री. दीपक संकपाळ

मूल्य :
रुपये सहा मात्र

# भाव तोची देव

2883 9/7/68

## १ मन शुद्ध तुझे

शिवाण्णा मोठे शिवभक्त होते. त्याना शिवभक्तीची गोडी त्यांच्या वडिलांपासून – धर्माण्णापासून – लागली होती. शिवाण्णा तसे सचोटीचे व्यापारी होते. त्यांच्या दुकानात मूल येवो, म्हातारा येवो, एकच दर होता. मालातही कधी भेसळ नसे. योग्य तितकाच फायदा ते घेत.

गावात त्यांची प्रसिद्धी होती, एक सचोटीचा शिवभक्त व्यापारी म्हणून. त्यांची पत्नी गिरीजा आपल्या पतीसारखी सालस, प्रेमळ. दारी कुणी आला, मग तो भिकारी असो नाहीतर अतिथी असो, रिकाम्या हाताने कधीच जात नसे. त्यांना गौरा नावाची मुलगी होती आणि शंकर नावाचा मुलगा होता. शंकर नऊ वर्षांचा होता. गौरा तेरा वर्षांची होती.

एका मोठ्या व्यापाऱ्याकडे एक लग्न निघाले. शिवाण्णाना जाणे भाग होते. तसे निमंत्रण सर्वांना होते. दोन-तीन दिवस

दुकान बंद करण्याची शिवाण्णांची तयारी होती, परंतु देवपूजा चुकते याचे त्याना दुःख होते.

यावर गिरीजाबाईना युक्ती सुचली, त्या म्हणाल्या,

' मी म्हणते असं करावं ... '

' काय करावं ?'

' गौरा राहील घरात आणि करील देवाची पूजा. '

गौरा तिथे होतीच. ती एकदम फणकाऱ्याने उत्तरली,

' मी नाही राहणार. मी येणारच तुमच्याबरोबर. किती गंमत असते लग्नात !'

संध्याकाळी जेवणाच्या वेळी पुन्हा या गोष्टीवर चर्चा झाली. गौराला पुजेसाठी राहण्याचा आग्रह करण्यात आला. पुन्हा तिने अनिच्छा दर्शविली. शंकरला आपल्या ताईची दया आली. तो आपल्या आईला म्हणाला,

' आई, ताईला घेऊन जा ना गं लग्नाला. मी राहीन घरात. '

' अरे, नुसतं घरात राहायचं नाही आहे. '

' मला माहीत आहे, देवाच्या पुजेसाठी राहायचं. '

' तुला कुठं येते पूजा करायला ?' शिवाण्णा म्हणाले.

' बाबा, बाबा ! अहो, मी सहज पूजा करू शकेन. त्यात काय अवघड आहे ? तुम्हाला पूजा करताना मी पाहिलंय की. '

शंकरच्या बोलण्याचे बाबाना कौतुक वाटले. ते म्हणाले,

' बेटा, कशी पूजा करायची असते ? सांग बरं ?'

एकाग्र मनाने शंकर सांगू लागला,

' – सकाळी उठायचे. अंघोळ करायची. पुजेची तयारी करायची, म्हणजे परडीत फुले ठेवायची, हळदीकुंकू घ्यायचे,

कापूर आरतीत कापूर ठेवायचा, धूप आरतीत उदवत्ती लावायची, निरंजनात वाती ठेवायच्या, बरोबर काडेपेटी घ्यायची, मंदिरात गेल्यावर गंध उगाळायचे. पळीपंचपात्र बरोबर न्यायचे. प्रथम आचमन करायचे.. मग मूर्तीवर फुलाने पाणी शिंपडायचे. मग गंध लावायचा, फुलं वाहायची, हळद–कुंकू घालायचे. मग उदवत्तीने ओवाळायचं. कापूर आरतीनं ओवाळायचं. नैवेद्य दाखवायचा. मग निरांजन लावून आरती म्हणायची.'

आरती करण्याचे हे तंत्र शंकरला इतक्या बारकाव्याने ठाऊक असेल, असे शिवाण्णाला वाटले नाही. ते खूप झाले. घरी स्वयंपाकाला बाई असली आणि गाईकडे पाहायला नोकर असला तरी तीन दिवस नऊ वर्षांच्या शंकरला घरी कसे ठेवायचे, याची मोठी चिंता लागून राहिली शिवाण्णाना. शंकर मोठ्या उत्साहाने म्हणाला,

'बाबा, मग येईल ना मला करायला आरती ?'

'होय.'

'मग तुम्ही खुशाल जा लग्नाला.' नाइलाजाने आणि गौराच्या हट्टाने पुजेचे काम शंकरवर सोपवून त्यांनी लग्नाला जायचे ठरविले. शिवाण्णा, गिरीजाबाई आणि गौरा लग्नाला गेले. आपल्याला शिवाची पूजा करायला मिळणार म्हणून शंकरचे मन उत्साहाने आणि भक्तिभावाने भरून गेले होते. दुसऱ्या दिवशी शंकर लवकर उठला. अंघोळ करून देवळात गेला. बरोबर सर्व पूजासाहित्य नैवेद्यासह होते. पूजा आटोपली. देवाला दाखविलेला नैवेद्य देवाने खावा म्हणून तिथेच पाच मिनिटे शंकर बसला. एकाग्र मनाने शिवाच्या पिंडीकडे त्याने पाहिले. शिव नैवेद्य खायला आला नाही. आपण इथे बसल्यामुळे तो आला नाही, अशी

...२

शंकरची समजूत झाली.

शंकर गाभाऱ्यातून बाहेर गेला. दरवाज्याचा पडदा त्याने ओढून घेतला. ओसरीजवळ खांबाला टेकून तो बसला. तो मनात देवाचे स्मरण करीत होता. देवाचा नैवेद्य खाऊन आता संपला असेल. पडदा बाजूला सारून त्याने पाहिले. नैवेद्य तसाच होता. देव आला नव्हता. शंकर बाहेर बसला. मनात तो देवाला म्हणाला, 'देवा शिवशंकरा, माझं काय चुकलं ? तू नैवेद्य खायला का येत नाहीस ? जर तू नैवेद्य खायला आला नाहीस तर मी इथेच बसून राहीन, अगदी सकाळपर्यंत. जर मग थंडीनं माझं काही झालं तरी मला त्याचं वाईट वाटणार नाही. मी पोर म्हणून माझा नैवेद्य तू खात नाहीस आणि बाबा थोर म्हणून त्यांचा खातोस.'

निष्पाप, निरागस शंकरच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहत होता. त्याला एकदम वाटले की आपलं गाऱ्हाणं देवानं ऐकलं.

शंकरने पडदा बाजूला सारून हळूच बघितले. भोळा शंकर निटक्या मारून या बालशंकराचा नैवेद्य खात होता. मोठ्या समाधानाने शंकर घरी परतला. चौथ्या दिवशी त्याचे बाबा, आई आणि ताई लग्नाहून परत आले. आपल्या पुजेची सारी हकीकत शंकरने बाबांना सांगितली. बाबाना समाधान वाटले. शंकर त्याना म्हणाला,

'बाबा, अहो मी दाखविलेला नैवेद्य शंकर स्वतः खात होता.'

'अरे, असं आपण समजायचं !'

'समजायचं काय बाबा ? प्रत्यक्ष मी डोळ्यांनी पाहिलंय.'

'काहीतरी थापा मारू नकोस.' गौरा म्हणाली.

'मग, चल तर उद्या बघायला.'

दुसऱ्या दिवशी शंकरबरोबर गौरा गेली. नैवेद्य दाखवून शंकर बाहेर आला. खांबाला टेकून तो आणि गौरा बसले. थोड्या वेळाने ' माझ्यामागून ये ' अशी खूण शंकरने गौराला केली. अलगद हातांनी शंकरने पडदा बाजूला सारला. दोघांनी वाकून पाहिले. दोघांना भोळा शंकर दिसला, मिटक्या मारीत नैवेद्य खात असलेला.

दुसऱ्या दिवशी बाबानी यायचे ठरविले. शंकरने पडदा बाजूला सारला. तिघांनी आत डोकावले. भोळ्या शंकरचा नैवेद्य खाऊन झाला होता. तो पिंडीमध्ये अंतर्धान पावताना शिवाण्णाना दिसला. पिंडीभोवती एक प्रचंड तेजोवलय अगदी डोळे दिपविण्याइतके त्यांना दिसले.

शिवाण्णांच्या तोंडून उद्‌गार गेले ' मन जितके शुद्ध, तितका देव जवळ, हेच खरे. '

## २ देवाचे दर्शन

एक छोटेसे गाव होते. त्याही गावाला एक छोटासा महारवाडा होता. गावाचे गावरान लहान होते. त्यात सुपीक जमीन थोडी. बाकीची सारी कोरडवाहू.

तरीही त्या गावाला पाटील होता, कुलकर्णी होता, वाणी होता, सावकारही होता. शंकराचे मंदिर होते. त्याला पुजारी होता आणि त्या मंदिराची एक देवदासीही होती. सणावारी ती

नाचायची. महारवाड्याची वस्ती जेमतेम पन्नास–साठ लोकांची. पाच–सहाशे वस्तीच्या गावाचा तो महारवाडा. महारवाड्यातले लोक शेतावर शेतमजूर म्हणून जात. उरलेले कुणी पाटलाकडे वेठविगार, कुणी वाड्याकडे झाडायला, लोटायला; कुणी सावकारांकडे त्यांचे हातपाय चेपायला. महारवाड्यातील पोरेसुद्धा गावातल्या धनिकांच्या पोरांना मदत करायला, सोबत करायला जायची.

असाच एकजण महारवाड्यातला होता.तो पुजाऱ्याच्या घरी कामाला जाई. पुजाऱ्याने पहिल्या पहिल्यांदा शिवाशिवी पाळली. पुजारी देवभक्त होता, शिवभक्त होता, गोरगरिबांची सुखदु:खे जाणणारा होता. त्या पोराची हुशारी, स्वच्छता, स्मरणशक्ती इत्यादी पाहून पोरगा नाव काढील म्हणून त्याला हाताशी धरायचे पुजाऱ्याने ठरविले. त्या पोराला शाळेला पाठविण्यात आले. तो चांगला शिकू लागला. त्याचे चार इयत्तेपर्यंतचे शिक्षण पुरे झाले. पुढच्या शिक्षणासाठी मावशीकडे जायचे त्याने ठरविले. शाळेत त्याचे नाव घालताना ‘ विठोबा ’ म्हणून घातले होते. तसे त्याचे नाव काही ठेवले गेलेच नव्हते. घरात म्हणत ‘दगड्या–धोंड्या’ मास्तरानी त्याला ‘ इटू ’ म्हटले आणि पुढे हा इटूचा विठोबा झाला.

विठोबा त्या गावातून तालुक्याच्या गावी आला. तालुक्याला हायस्कूल होते. तालुक्याचा गाव मोठा तसा तिथला महारवाडाही मोठा. विठोबाची मावशी कमळाबाई त्या महारवाड्यातील जणू पुढारीणच होती.

हरिजनांच्या शाळाप्रवेशाचा कायदा झाला, मंदिरप्रवेशाचा कायदा झाला. हरिजनांना गावतळ्यावर पाणी भरायला मज्जाव

करायचा नाही, असाही कायदा झाला होता.

परंतु कायद्याने प्रश्न सुटत नाहीत. ते नीतीने व समजूतदारपणाने सुटतात. विठोबाला शाळेत प्रवेश मिळाला. तिथे तो चमकला; पण मंदिरप्रवेशात हरिजनांना यश आले नाही. पुजाऱ्यांच्या संगतीत लहानाचा मोठा झालेला विठोबा भाविक बनला होता. त्याने महारवाड्यात एका दगडाला शेंदूर फासला होता. तो त्याला आपला भगवान शंकर मानीत होता. त्या तालुक्याच्या गावात हरिजन चळवळ करीत होते. कमळामावशी सगळ्यांत पुढे होती. त्या गावाचे शिवमंदिर अतिशय सुंदर होते. तिथे भाविकांची गर्दीच गर्दी असे; परंतु हरिजनांना प्रवेश नसे. विठोबाने त्या मंदिरात प्रवेश करण्याचे ठरविले.

मंदिर प्रवेशाचा मुहूर्त काढण्याचा विचार करता करता त्यांच्या महारवाड्यावर नव्हे तर त्या गावावर दुष्काळाचे संकट आले. तरीही मंदिरप्रवेशाचा विचार विठोबा बाळगून होता.

तो गांधीवादी होता. त्याने पुजाऱ्याला कळविले, मी देवळात शिरणार आहे. देवदर्शन घेणार आहे. दुसऱ्या दिवशी विठोबा मंदिरात गेला. पुजाऱ्याने त्याला अडविले. विठोबा म्हणाला,

‘ तुम्ही आम्हाला अडवू शकणार नाही. ’

‘ कायदा आता आमच्या बाजूला आहे. ’

‘ कायद्यापेक्षा रूढी श्रेष्ठ असते. शंकराला दाखविण्यासाठी काहीतरी नैवेद्य आणल्याशिवाय आम्ही आत सोडत नाही. ’

विठोबाची निराशा झाली. दुसऱ्या दिवशी त्याने नैवेद्य म्हणून मावशीने दिलेला भाकरीचा शिळा तुकडा नेला. पुजाऱ्याने त्याला अडविले. विठोबा म्हणाला,

'का अडवलंत मला ? आज मी नैवेद्य आणला आहे.'

'असला नैवेद्य चालत नाही आमच्या देवाला.'

तो भाकरीचा तुकडा खिडकीतून बाहेर दूरवर पुजाऱ्याने टाकला. त्या भाकरीच्या तुकड्याशिवाय त्याच्या घरात काही नव्हते आणि जे होते, त्याच्या वाट्याला जे आले होते ते सगळे नैवेद्य म्हणून विठोबाने आणले होते. तथापि धीर धरून, धिटाई करून शेजारच्या घरातली एक चपाती त्याने नैवेद्य म्हणून आणली. त्या पुजाऱ्याने त्याला दारावर अडविले; कारण सावकारांचा श्रीखंडपुरीचा नैवेद्य पाच रुपयांच्या दक्षिणेसह आला होता. पुजाऱ्याने नम्र भावनेने सावकाराला नमस्कार केला. त्याला आत देवदर्शनाला सोडले. त्याच्यामागून विठोबा जाऊ लागला. पुजाऱ्याने विठोबाला अडविले.' कसला भिकारडा नैवेद्य!' चपाती त्याने दूरवर फेकून दिली आणि दोन हरिजन पोरे त्या चपातीवर तुटून पडली. विठोबाला फार वाईट वाटले. निष्पाप मनाची निर्मळ सेवा शंकराला आवडतच नाही काय ? आणि जर आवडत असेल तर मग तो माझी सेवा का नाकारत आहे ? मग हा देव, देव नसून दगडच असला पाहिजे, असे विठोबाला वाटले.

त्या दिवशी खट्टू मनाने विठोबा देवळातून घरी परतला. कमळामावशीनं आग्रह केला. त्याच्या जेवणात गोड गूळ वाढला. पण त्या दिवशी विठोबाला गूळ गोडच लागला नाही. तसाच तो झोपी गेला. झोपही गाढ लागली नाही. अर्धवट झोपेत वेडी-वाकडी स्वप्ने पडतात म्हणे.

' त्याला एक लांब लांब काळा नाग दिसला. तो विठोबाला बोलवू लागला. विठोबा त्याच्यामागून जाऊ लागला. नाग गतीने जाऊ लागला. विठोबा धावू लागला. विठोबाला घेऊन नाग त्या

जंगलातल्या शिवमंदिरात आला. उदबत्त्यांचा सुगंध दरवळत होता. परंतु कुठे लावलेली उदबत्ती दिसतच नव्हती. विठोबाने शंकराकडे पाहिले आणि त्याला समाधान वाटले. त्याला बरोबर घेऊन येणारा नाग शंकराच्या अंगावर चढून त्याच्या गळ्यात फडा काढून बसताना त्याला दिसला. पुन्हा विठोबाने नमस्कार केला. पहिला शंकराला, दुसरा नागाला. विठोबाच्या मनात विचार आले, मी पुढे जावे की इथंच थांबावे ? गाभाऱ्याजवळ या देवळाचा पुजारी मला अडविणार तर नाही ? विठोबाने आसपास पाहिले. तिथे पुजारीच नव्हता. मग अडविणार कोण ? विठोबाला शंका आली, इथे पुजारी का नाही ? विठोबाच्या मनातील या शंका शंकराला समजल्या. शंकर विठोबाला म्हणाला,

'अरे माझ्या विठू, तुला आलिंगन द्यायला मी किती अधीर झालो आहे ! या मंदिरात प्रसादाचे ढोंग नाही. कारण जिथे नैवेद्य दाखविला जातो, जेथे श्रीमंत पापे पचविण्यासाठी काहीतरी मागत बसतात. तिथे मी नसतोच मुळी. मी या जंगलातल्या मंदिरात वास्तव्य केले आहे. जो जो भाविक तो तो माझा. जो भाविक नाही तो मला आवडत नाही. तुला आता त्या देवळात जाण्याची गरज नाही. इतरांप्रमाणे तू इथे वावरू शकतोस. इथे ब्राह्मण–महार भेद नाही. गरीब–श्रीमंत भेद नाही. इथे एकच मानल जाते, तो भाविक हवा. भक्तीचा भुकेला हवा. या देवळात राहणे मी पसंत केले' आणि मग इतर सगळ्याच देवांनी आपापली निवासस्थाने सोडून दिली आणि जगलात वास्तव्य केले.

इतक्यात कुणी एक भाविक शंकराच्या दर्शनाला आला आणि त्याने 'जय देव जय देव जय श्री शंकरा' ही आरती

म्हणायला सुरुवात केली.

विठोबाने ' जय देव जय देव ' असे म्हटले. किती उशीर झोपायचे म्हणून पाठीत मावशीने दोन धपाटे घातले. त्या आवाजाने विठोबा जागा झाला. मावशी म्हणाली,

' स्वप्न का पडलं होतं तुला ?'

विठोबाने मावशीला उत्तर दिले नाही. पुन्हा गावातल्या शंकराच्या दर्शनाला तो कधी गेला नाही. लोकांच्या दृष्टीने हा खरा भाव भोळा, निरागस म्हणून गणला जाऊ लागला.

## ३ पांडुरंगाची कृपा

एक होता शेतकरी. विठोबा त्याचे नाव. त्याला एक बायको होती. रखमा तिचे नाव. शेतकरी कष्टाळू होता. रखमाही कष्टाळू होती. त्यांना एक मुलगा होता. गोविंदा त्याचे नाव. गोविंदाला आठवे वर्ष लागले होते.

विठोबा देवभक्त होता. दर एकादशीला तो पंढरीची वारी करी. रोज रात्री जेवण झाल्यावर देवळात भजनाला जाई. तो भजन सांगे. त्याचा आवाज गोड होता. त्याची भजने लोकांना आवडत. अनेक संतांचे अभंग त्याला तोंडपाठ होते.

विठोबाचे तीन एकरांचे रान होते. पावसाळा जवळ आला होता. त्याने मशागत सुरू केली. कुणीतरी सांगितले, यंदा पाऊस लवकर येणार आहे. मग विठोबाची आणि रखमाची धांदल उडून

गेली. दिवसभर शेतामध्ये ते मशागत करीत होते.

एकदाची मशागत संपली. विठोबा आणि रखमा यांना आनंद झाला. असेच एके संध्याकाळी सूर्य मावळल्यावर शेतातून रखमा आणि विठोबा परत येत होते. त्यांच्या संसाराचे सुख त्यांच्या दैवाला पाहवले नाही. रखमाला साप चावला. कसल्याच उपचाराने ती बरी झाली नाही. ती तडफडली, तडफडली आणि देवाघरी निघून गेली.

रखमाचा विरह विठोबाला सहन झाला नाही. तो मूळचाच देवभक्त होता. आता त्याच्यात वैराग्य संचारले. भावाने त्याची समजूत घातली, दुसरे लग्न कर. विठोबाला पटले नाही. देवाची भक्ती, पंढरीची वारी आणि रोज रात्री अभंगांचं भजन. एक थोर देवभक्त म्हणून विठोबाची कीर्ती त्याचे गाव ओलांडून पंचक्रोशीत पसरली.

गोविंदाला विठोबाच्या भावाने दत्तक घेतले. विठोबाची शेती गोविंदा आणि त्याचा काका करू लागले.

विठोबाचे लक्ष संसारातून उडाले. पंढरीची वारी करून तो परतत असे; पण आता तो तिकडे आठ–आठ दिवस राहू लागला. भावाच्या आणि मुलाच्या परवानगीने पंढरीतच विठोबाने आपले राहण्याचे ठिकाण केले. त्याला एक मठी मिळाली.

विठोबा पहाटे उठे. मठी झाडी, पाणी मारी, मग चंद्रभागे-वर जाऊन अंघोळ करी.

असेच एके दिवशी विठोबा स्नान करून परतला. मठी-बाहेरच पायरीवर 'पांडुरंग पांडुरंग' असा जप करीत तो बसला. इतक्यात –

तीन तगडे जवान त्याच्याजवळ आले. एकाच्या हातात जड

पत्र्याची पेटी होती. त्यांनी ती विठोबाच्या डोक्यावर ठेवली. त्यांतील एकजण म्हणाला,

'चल आमच्याबरोबर गावाबाहेर ही पेटी घेऊन. नाही म्हणशील तर – '

त्याला तिघांनी तीन सुरे दाखविले. 'पांडुरंग पांडुरंग' म्हणत विठोबाने ती पेटी डोक्यावर घेतली. 'पांडुरंग पांडुरंग' म्हणत तो चालू लागला.

पंढरीची हद्द संपली. पोलिसांच्या शिट्ट्या वाजल्या. विठोबाची दातखिळी बसली. विठोबाबरोबर चालणारे ते तीन तगडे जवान तीन दिशांनी पळून गेले. मागून पोलिस आले. विठोबाला त्यांनी पकडले. चौकीवर नेले.

सावकाराच्या घरी चोरी झाली होती. चोरीचा माल जशाचा तसा त्या पेटीत होता. पोलिसांनी विठोबाला चोर ठरविले, विठोबावर खटला भरला गेला. विठोबाला पोलिस कोठडी देण्यात आली. पोलिसांनी, त्याला मारले नाही. विठोबा पांडुरंग भक्त आहे, हे पोलिसांना माहीत होते.

पोलिसांनी विठोबाला खूप प्रश्न विचारले. विठोबाची दातखिळी बसली होती. त्याला उत्तर देता येईना. प्रश्न कानांवर पडताच मनातल्या मनात विठोबा फक्त 'पांडुरंग पांडुरंग' म्हणत होता. विठोबाजवळ चोरीचा माल सापडला होता. पोलिस त्याला सोडू शकत नव्हते.

न्यायाधीशापुढे खटला चालला. विठोबाच्या दातखिळीमुळे सरकारी वकिलाचा काही इलाज चालेना. सावकाराच्या वकिलाने विठोबाला चोर ठरविले; पण न्यायाधीशांचे मन दयेने भरून आले. त्याचे डोळे पाण्याने डबडबले. रुद्ध कंठाने न्यायाधीशानी

अखेरचे विचारले.

' विठूराया, हे दागिने तू चोरलेस का ?'

विठोबाने न्यायाधीशांकडे पाहिले. त्यांच्या डोळ्यांत त्याला ममतामयी कारुण्याची चमक आढळली.

विठोबाची दातखिळी सुटली. त्याला वाचा फुटली. त्याने घडलेली सारी हकीकत सांगितली. विठोबा निर्दोष आहे अशी न्यायाधीशांची खात्री पटली. सावकाराचा वकील विठोबाची हकीकत ऐकून म्हणाला, ' विठोबा निर्दोष आहे. '

सावकार म्हणाला, ' होय होय, विठोबा निर्दोष आहे. '

पोलिसांनी विठोबाला सोडले. न्यायाधीशांना हात जोडून विठोबा म्हणाला,

' मायबापा, तुमच्यातल्या पांडुरंगाने आज माझ्यावर कृपा केली. '

विठोबाने पांडुरंगाचे दोन अभंग आळविण्याची परवानगी मागितली. विठोबाने अभंग आळविले. सर्वांना जणू वाटले हे न्यायालय नाही, तर जणू पंढरीच्या पांडुरंगाचे मंदिरच आहे !

# ४ भोळी भक्ती

पांडव सकाळी लवकर उठून द्रौपदीसह भजन करीत होते – ' कृष्ण, मुकुंद, मुरारी ... ' उशिराने तिथे भीम आला. अर्जुन म्हणाला,

'उशिराने उठतो. आमच्यावरोवर भजनाला येत नाही. भक्ती नाही तर शक्ती काय कामाची ?'

आपण कुशल धनुर्धारी आहोत, याचा अर्जुनाला अभिमान होता. कृष्णाचा आवडता भक्त आपणच असेही त्याला वाटे.

दुसऱ्या दिवशी भजनाच्या वेळी कृष्णाला जेवायला बोलवायचे ठरले. धर्मराज म्हणाला, 'अर्जुन जाऊन निमंत्रण देईल तरच कृष्ण येईल.' अर्जुन गेला. कृष्ण आला नाही. द्रौपदी म्हणाली, 'धर्मराज, आपणच जावे, आपण म्हणजे मूर्तिमंत धर्म.' द्रौपदीच्या स्तुतीने धर्मराज भाळला. तो कृष्णाला बोलवायला गेला. कामाची सबब सांगून कृष्णाने आमंत्रण नाकारले. धर्मराज खजिल झाला. कृष्णाचा आवडता भक्त आपणाहून धर्मराज नाही याचे अर्जुनाला समाधान वाटले. सर्वजण गंभीरपणे विचार करू लागले. इतक्यात उशिरा उठलेला भीम आळस देत त्या ठिकाणी आला. तो सर्वांना म्हणाला,

'आपण असे चिंतातुर का ?'

युधिष्ठिराने खुलासा केला, 'कृष्णाला जेवायला बोलवावे ही द्रौपदीची इच्छा; पण त्याने माझे किंवा धनुर्धारी अर्जुनाचे आमंत्रण स्वीकारले नाही.'

'इतकेच !' भीम हसला व म्हणाला, 'मी जातो.'

'तू कशाला ?' अर्जुन उपहासाने म्हणाला,

'कृष्णाला निमंत्रण द्यायला नव्हे तर उचलूनच आणायला !'

'शहाणाच आहेस !' धर्मराज म्हणाला.

द्रौपदी म्हणाली, 'भीमराज जाताहेत ना ? जाऊ द्या की !'

सर्वांनी भीमाला परवानगी दिली.

कृष्णाकडे भीम गेला आणि म्हणाला, ‘ कृष्णा, चल. द्रौपदीने तुला जेवायला बोलाविले आहे आणि मी तुला आणतो असे सांगितले आहे. ’

‘ अरे बाबा, मी किती कामात आहे ठाऊक आहे का तुला ? ’

‘ ते मला कसं ठाऊक असणार ? ’

‘ बाबा, तू परत जा. तुझ्यावर कुणी रागावणार नाहीत. अर्जुनाला आणि धर्मराजाला मी तसेच सांगितले आहे. ’

‘ ते तुमचं राजकारण मला कळत नाही. मी रिकाम्या हाताने जाणार नाही. ’

‘ मग मला उचलून नेणार म्हण की ! ’

‘ तसंही नाही. मी का तुझा लाडका भक्त ? हे पहा कृष्णा ’ असे म्हणत भीमाने आपली गदा सर्वशक्तीनिशी आकाशात फेकली आणि तो कृष्णाला म्हणाला, ‘ ती आता आकाशातून माझ्या डोक्यात पडेल आणि माझा कपाळमोक्ष होईल. ’

वरून गदा खाली अतिवेगाने येऊ लागली. कृष्णाने ती वरच्यावर झेलली. भीमाबरोबर कृष्ण जेवायला आला.

द्रौपदी उद्गारली, ‘ जपतपाच्या गहन गूढ भक्तीपेक्षा उघड उघड भोळी भाबडी, निरागस राकट भक्ती कृष्णाला आवडते असे दिसते ! ’

क्र. .2613.. दिनांक 9/2/68.

## ५ ऊस डोंगा, परी...

महाभारताची लढाई संपली होती.

एकटचा भीमाने शंभर कौरव मारले. अभिमन्यूला सर्व कौरवांनी मिळून एकटा गाठून मारले. कर्णाला अर्जुनाने मारले.

पांडवांचा विजय झाला. धर्मराज राज्य करू लागला. महाभारताच्या लढाईत भगवान कृष्णाने मौलिक कामगिरी केली होती. थोडे दिवस पांडवांकडे राहून कृष्ण धर्मराजाला म्हणाला,

'आता मला द्वारकेला गेले पाहिजे.'

आपला रथ घेऊन श्रीकृष्ण द्वारकेला निघाला. त्याचा रथ नदीकाठाने जात होता. घोडचांना तहान लागली होती. श्रीकृष्णाला पाणी पिण्याची इच्छा झाली. एका घाटाजवळ त्याने रथ उभा केला. घोडचांना त्याने पाणी पाजले. घोडे रथाला जुंपले. कृष्ण पाणी पिण्यासाठी गेला. श्रीकृष्ण पाणी प्याला. परतताना त्याला घाटाच्या पायऱ्या उतरत असलेले उत्तांग ऋषी दिसले.

त्यांनी एकमेकांना नमस्कार केला. उत्तांग ऋषी म्हणाले,

'बरं झालं श्रीकृष्णा, एका गोष्टीची आठवण झाली.'

'कोणत्या गोष्टीची, मुनिराज ?'

'ते कौरव आणि पांडव फार भांडत होते म्हणे ? अगदी हातघाईवर आले होते.'

'होय मुनिराज, तुमचे बरोबर आहे.'

'मग पुढे काय झाले रे त्यांचं ? बाकी तू तिथं असताना तू नक्कीच त्यांचे भांडण मिटविलेले असणार.' 'आता त्यांचं ठीक चाललं आहे ना ?'

श्रीकृष्णाने उत्तांग मुनींना सारे महाभारत समजावून सांगितले. प्रचंड झालेल्या हिंसेचे त्याने रसभरित वर्णन करून त्याना सांगितले.

उत्तांग मुनींना कृष्णाचा खूपच राग आला. ते चिडून म्हणाले,

' कृष्णा, अरे तू स्वतःला देवाचा अवतार म्हणजे भगवंत समजतोस आणि तुझ्यादेखत एवढी हिंसा ? त्याला मीच तुला जबाबदार धरतो. तूच मतलबीपणाने हे सारे घडवून आणले असावेस, यात शंका नाही. '

' मुनिराज, राग आवरा. तुमच्यासारख्याला हा राग शोभा देत नाही. '

' ते काही नाही. मी तुला शापच देतो. '

कमंडलूतील पाणी घेऊन शाप देण्याच्या पवित्र्यात उत्तांग मुनी उभे राहिले.

त्याना नमस्कार करून अत्यंत नम्रपणे श्रीकृष्ण म्हणाला,

' प्रथम माझे ऐका. मग खुशाल शाप द्या. '

पांडवांशी किती दुष्टपणाने कौरव वागले ! त्यांनी भीमाला विष पाजले, द्रौपदीची विटंबना केली, त्यांना लाक्षागृहात जाळण्याचा प्रयत्न केला, साधी पाच गावे मागितली तरी ती देऊन संधी करण्यास दुर्योधन तयार झाला नाही, ही सर्व हकीकत कृष्णाने उत्तांग मुनींना ऐकविली.

कौरवांच्या दुष्टपणाची खात्री मुनिराजाना झाली. कृष्णापुढे हात जोडून मुनिराजानी त्याची क्षमा मागितली. ते म्हणाले,

' कृष्णा, अरे रागाच्या भरात मी तुला शाप की रे देत होतो ! परंतु त्यापासून तू मला वाचविलेस. '

मुनिराजांचा राग शांत झाला. ते मोकळ्या मनाने श्रीकृष्णाशी बोलू लागले. बोलता बोलता आपली एक अडचण मुनिराजानी सांगितली. ते म्हणाले.

‘ आम्ही तीर्थयात्रा करू लागलो की चालून चालून तहानेने व्याकुळ होतो. मधे कुठे पाण्याची सोयच नाही. यावर काही तुझ्या-जवळ उपाय आहे का ? ’

‘ बाकीच्यांचे राहू द्या, मुनिराज, पण तुमची मात्र सोय मी निश्चित करतो. ’

श्रीकृष्ण पुढे सांगू लागला,

‘ तुम्ही प्रवास करताना तुम्हाला जर तहान लागली तर नुसते ‘ कृष्ण, कृष्ण ’ म्हणा, तुम्हाला तिथे लगेच पिण्याचे उत्तम पाणी मिळू शकेल. ’

मुनिराज आपल्या पुढील यात्रेला निघून गेले. श्रीकृष्ण रथात बसून द्वारकेच्या मार्गाने गेला.

उकाड्याचे दिवस होते. चालता चालता मुनिराजाना तहान लागली. श्रीकृष्णाचे शब्द खरे आहेत काय हे पाहण्याची त्याना इच्छा झाली. त्यानी डोळे मिटून ‘ कृष्ण, कृष्ण ’ म्हटले.

मुनिराज पुढे चालू लागले. वळणाच्या रस्त्यासमोरून एक चांडाल आपल्या रेड्याच्या पाठीवर पाण्याची पखाल टाकून येत असलेला त्याना दिसला. जवळ येताच तो चांडाल मुनिराजाना म्हणाला,

‘ नमस्कार मुनिराज ! ’

‘ दूर हो, दूर हो. तू चांडाल आहेस. तुझी सावलीसुद्धा माझ्या अंगावर पडता कामा नये. ’

‘ ठीक आहे, मुनिराज. ’

'नाही मी माझी सावली तुमच्या अंगावर पडू देत. परंतु मुनिराज, तुम्ही खूप तहानलेले दिसता. तुमचा चेहरा निस्तेज झाला आहे. घामाने डबडबलेला आहे.'

'तुला त्याच्याशी काय कर्तव्य आहे ?'

'अहो, माझ्या या रेड्यावरच्या पखालीत स्वच्छ, थंडगार गोडगोड पाणी आहे. ते प्याल तर आपली तहान भागेल. पुन्हा चालण्याला तुम्हाला नवा उत्साह येईल.'

'छे छे, चांडाला.' तिरस्काराने मुनिराज बोलू लागले 'आधी तू चांडाल घाणेरडा. त्यात तो तुझा रेडा तुझ्याहून घाणेरडा. त्यात त्या पखाली म्हणजे कातड्याच्या पिशव्या.कधी धुतल्यात की नाहीत पत्ता नाही. मी त्यातील पाणी पिऊन स्वत: भ्रष्ट होणार नाही आणि माझी इतक्या दिवसांची तपश्चर्या फुकट घालविणार नाही.'

'मग माझा नाइलाज आहे.'असे म्हणत तो चांडाल पुढे चालू लागला. काही अंतर चालून गेल्यावर मुनिराजांच्या कानी एक खो–खो हसण्याचा आवाज आला. मुनिराजानी मागे वळून पाहिले. चांडाल श्रीकृष्ण झाला होता. रेड्याचा सुंदर घोडा, पखालीच्या दोन सुंदर घागरी. त्यांत पाणी होते जणू अमृतापेक्षा गोड !

श्रीकृष्णच हसला होता. मुनिराजानी त्याच्याकडे पाहिले. त्याना पश्चात्ताप झाला, परंतु वेळ टळून गेली होती. कारण कृष्ण, घोडा आणि पाण्याच्या घागरी अदृश्य झाले होते.

# ६ देव पावला

एक होती म्हातारी. तिला नातू होता. राघव त्याचे नाव. राघव आळशी होता. म्हातारीला त्याचा राग येई. ती टाकून बोले. म्हणे, ' आळशी ठोंब्या ! '

राघवचा आळस वाढला. म्हातारी चिडली. म्हणाली,

' चालता हो घरातून..'

राघवही चिडला. घराबाहेर गेला. गावाबाहेर गेला. तो पुढे पुढे चालला. रान लागले. रानात त्याला एक डबके दिसले. डबक्याच्या काठावर एक कोळी होता. कोळी मासे पकडायला बसला होता. कोळ्याच्या गळाला मासा लागला. कोळ्याने दोरी ओढली. भला मोठा मासा. कोळी म्हणाला,

' एवढा मासा विकला म्हणजे पंधरा दिवसांची काळजी नाही. '

हे राघव बघत होता.

राघव मनात म्हणाला की माझ्यासारख्या आळशाला हा धंदा चांगला आहे.

कोळी म्हणाला, ' राजाच्या राजवाड्यात जा. तिथे मोठी बाग आहे. बागेत छोटे तळे आहे. तळ्याकाठी रामाचे देऊळ आहे. तळ्यात मोठे मासे आहेत. त्यांतला एक तुला मिळाला तरी तीन महिन्यांची काळजी मिटेल. पण रात्री जा. '

राघव राजाच्या बागेत गेला. तळ्याकाठी बसला. त्याच्या गळाला मासा लागला. मोठमोठा मासा. मासा तडफडू लागला. माशाच्या तडफडण्याच्या आवाजाने राजसेवक जागे झाले. ते

ओरडले, ' चोर, चोर, चोर, धावा, धावा, धावा. '

राघव घाबरला. त्याने दोरी टाकली. गळासकट मासा तळ्यात गेला. राघवच्या जवळ राख दिसली. राघव उघडा झाला. त्याने अंगाला राख फासली. त्याला राम आठवला. मनात म्हणाला, ' प्रभु रामचंद्रा, मला वाचव. '

राघव रामनामाचा जप डोळे मिटून त्या तळ्याकाठी करू लागला. तिथे राजसेवक आले. त्यांनी पाहिले सारे शांत. चोर नाहीच. उलट साधू आहे. तळ्याकाठी आला आहे. त्याला तळ्याकाठची जागा आवडलेली दिसते. राजसेवक वाकले. त्यांनी लोटांगण घातले. राजसेवकांनी ' रघुपति राघव राजाराम पतित पावन सीताराम ' हा रामनाम जप साधूच्या तोंडून ऐकला.

पहाट झाली होती. दोन राजसेवक राजाकडे धावले. दुसऱ्या दोन राजसेवकांनी राघवजवळची जागा साफ केली. राजा आला. त्याने बरोबर भोग आणला. राजाने विनंती केली. राघवने मानली. स्वीकार केला. राजा म्हणाला, ' मी धन्य झालो. राघवाच्या कृतीने राघवस्वामी माझ्या बागेत अवतरले. '

सगळीकडे बातमी पसरली. प्रजाजनही भोग घेऊन येऊ लागले. राघव खाणार किती ? पोट भरल्यावर इतरांना प्रसाद वाटू लागला. प्रसादाच्या आशेने गोरगरीब येऊ लागले. पोटभर प्रसाद खाऊन दुवा देऊ लागले. आळशी राघवचा राघवस्वामी झाला. स्वामीजींना शांतता रात्रीच मिळे... एके रात्री त्यांनी विचार केला,

' सोंग करून इतके मिळाले! खरा साधू होऊन काय मिळते ते पाहिले पाहिजे. '

राघवला रामनामाची गोडी लागली. अगदी वाल्या

कोळ्यासारखी. लोकांचे येणे-जाणे, भोग आणणे, खाणे, वाटणे, राजाची स्तुती हे सारे राघवला आवडेनासे झाले.

त्याने ठरविले, हिमालयात जावे. तपश्चर्या करावी.राघवने आपला बेत त्या रात्री तडीस नेला. दुसऱ्या दिवशी सकाळी राजा आला. त्याला दिसले, राघवस्वामी तिथे नाहीत. राजाला दुःख झाले. राघवस्वामींची बैठकीची जागा राजाने स्वच्छ करून तिथे त्यांचे स्मारक बांधले. त्यावर मंत्र कोरला, ' रघुपती राघव राजाराम, पतित पावन सीताराम. '.

राजाने खूप शोध घेतला. राघवस्वामी आढळले नाहीत. स्मारकाच्या दर्शनाला राजा व प्रजा येऊ लागली. राघवस्वामी नवसाला पावतात, असे कुणीतरी बोलाफुलाला गाठ पडल्यामुळे उठविले.

खरे-खोटे काही असो; पण रामनाम जपाने राघवला रघुपती राघव पावला, हे मात्र खरे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
अ. क्र. 2CC3 दिनांक 7/7/18
विषय ..... ..... क्र.........

BVBK-0402883